# अमरावती शहर दैनंदिन गुन्हे अहवाल दिनांक २४/०४/२०२४

## दुखापत :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. गाडगेनगर अमरावती शहर अप क्र.४०६/२४ कलम ३२४,३४ भादवी | विलास नगर अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.२३/०४/२०२४ चे १४.०० वा गु.दा.ता.वेळ दि.२३/०४/२०२४ चे १९.३५ वा. | नितीन वासुदेवराव काळबांडे वय ४५ वर्ष व्यवसाय ऑटो चालक रा.कठोरा बुजुर्ग अमरावती | १) पटेल ,२) पटेलचा साळा ,३) जगदीश काळे तिन्ही रा.अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, फिर्यादी यांनी त्याच्या मित्र यांचे माध्यमातुन पटेल रा.अमरावती याचे कडे कार्ड काढले त्यावर मी दि.०७/०१/२०२४ रोजी मी विलास नगर येथिल पटेल यांचे कार्यालयातुन पटेल यांच्याकडुन ६०००/- रुपये घेतले साठ हजार रुपयाचा परतावा मला ६९० /- रु,प्रतिदिन त्याचे कार्यालयामध्ये भरायचा होता त्याप्रमाणे मी दररोज ६९०/- रु.पटेल यांच्याकडे त्याचे कार्यालयामध्ये भरत होतो कधी कधी फिर्यादी दररोज पैसे भरल नाही तर मी एकाच वेळी पैसे भरत होतो आठ दिवसापुर्वी मी पटेल यांच्याकडे २५हजार रु.भरले होते आज दि.२३/०४/२०२४रोजी मी ऑटोचे भाडे घेवुन विलास नगरकडे गेलो होते परत येतांना दुपारी ०२.०० वा.थांबवुन पैश्याबाबत विचारपुस केल्याने मी त्याला उर्वरात ८४६०/- रु.हिशोब कराल त्या दिवशी देतो म्हणालो असता आरोपी १.२.३ यांनी मला पैसे जास्त होतात म्हणुन शिवीगाळ करुन तिघांनी आफिसमध्ये जावुन लोखंडी रॉड आणला व लोखंडी रॉडने मला मारहाण केली पटेल यांनी लोखंडी रॉड माझ्या डाव्या पायावर मारल्यामुळे मी खाली पडलो माझ्या पायाला जखम होवुन त्यातुन रक्त वाहत आहे म्हणुन तिघांविरुध्द माझी तक्रार आहे .हिच माझी तोंडी रिपोर्ट आहे मराठी मध्ये लिहिला वाचुन पाहीला माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.अशा फि.च्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## पळवुण नेणे :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. गाडगेनगर अमरावती शहर अप क्र.४०५/२०२४ कलम ३६३ भादवी | अमरावती | गु.घ.ता.वेळ दि.२२.०४.२०२४ चे १२.०० वा दरम्याण माहीती गु.दा.ता.वेळ दि.२३/०४/२०२४ चे १७.४९ वा. | एक महिला | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की, दि.२२/०४/२०२४ ला फिर्यादी ह्या नेहमी प्रमाणे सकाळी ११.०० वा. घरकामावर गेली त्यावेळी फिर्यादीची २ मुलगी घरी होत्या संध्याकाळी ७.०० वा. फिर्यादी ह्या कामावरुन घरी गेली तर फर्यादीची एक मुलगी घरी होती तिने सांगितले की, १२.०० वा.फोटो काढायला गाडगेनगर येथे गली तेव्हापासुन ती घरी आली नाही मी तीचा मो.क्र.वर फोन केला पण फोन बंद होता अभ्यासिकेत गेली व काय म्हणुन विचारणा केली तर ती आली नाही पण समोर तिची गाडी उभी आहे असे तेथिल विद्यार्थीनी फिर्यादीला सांगीतले ह्यावरुन ती कोठे तरी बाहेर गेलेली आहे व हरविली आहे अशी फिर्यादीच्या जबाणी रिपोर्ट वरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ वाहन चोरी :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे. गाडगेनगर अप.क्र. ४०४/२४ कलम ३७९ भा.द.वि. | शिवाजी कालेज चे पार्किग अमरावती | दि. २२.४.२४ च १२.०० वा<br><br>दाखल दि. २३.४.२४ चे १४.१२ वा दाखल | एक महिला | अज्ञात इसम | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी फि.ची मुलगी कॉलेजमध्ये तिची सायकल घेवुन कॉलेजच्या पार्कीगमध्ये चौकीदाराला लॉक न लावता माहीती देवुन तिचे क्लास ला गेली व क्लास झाल्यानंतर १२.३० वा परत आली असता तिची सायकल पार्किंगमध्ये दिसली नाही तेव्हा तिने फि.ला फोन लावुन माहीती दिली सायकलचा शोध घेतला मिळुन आली नाही. चोरी गेलेल्या सायकलचे वर्णन, - चेतक साईकल रंग- सिल्वर, किं.अं. ५०००/- रु. अशा फि.च्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |
| २ | पोस्टे | हनुमान | दि १८/४/२४ चे | एक महिला | अज्ञात | थोडक्यात हकिकत अशा प्रकारे आहे की नमूद घ.ता.वेळी व ठिकाणी यातील फीर्यादीचा |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | राजापेठ अप क्र २३६/२०२४ कलम ३७९ भादवी | व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथील MCAकॉलेज मधील पार्कींग | १८.०० ते १९.३० वा दरम्यान दाखल दि २३/४/२४ चे १९.३० वा | | | मुलगा नामे देवांश वसंतराव राठोड हा ८ व्या वेगात शिकत असुन त्याचे कडे मॉर्गन २६ प्रो काळया निळया रंगाची सायकल जिचा फ्रेम क्र H२०१३६२९ किं अं४००० रु ची सायकल आहे तो HVPM येथे कॅम्प सुरु असल्याने तो व्यायाम करण्यासाठी रोज सायंकाळी ०६.३० ते ०७.३० HVPM येथे येतो व सायकल हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथील MCAकॉलेज मधील पार्कींग मध्ये स्टँडवर लावतो दि १८/४/२४ रोजी सायंकाळी ०६.०० वा दरम्याने त्याने सायकल लॉक करुन स्टँडवर लावली व क्लास ला गेला क्लास आटोपल्या नंतर घरी जाणे करीता सायकल स्टँड वर गेला असता त्याने लावलेली सायकल त्याला दिसुन आली नाही त्याने आजुबाजुला शोध घेतला मिळुनआली नाही वरुन फी चे जबाणी रिपोर्ट वरुन गून्हा दाखल |
| ३ | खो गेट अम शहर अप क्र ११८/२०२४ कलम ३७९ भादवि | नविन अमरावती अकोली रेल्वे स्टेशन अमरावती | २२/४/२४ चे १९.०० वा दरम्याण दाखल २३/४/२०२४ चे २२/०० वा | सर्वज्ञ अनंत सामदेकर वय २१ वर्ष रा साई नगर मंदीरा जवळ अमरावती | अज्ञात | हकीकत अशा प्रकारे आहे की नमुद घटना ता वेळी व ठिकाणी फि ला त्याचे वडीलांना रेल्वे स्टेशन येथे सोडणे करीता आत मध्ये गेले व त्यांची मोटर सायकल हि रेल्वे स्टेशन चे बाहेर लॉक करुन ठेवली असता त्यांचे वडीलांना सोडुन फि हे आपल्या मोटरसायकल जवळ परत आले त्यांची दुचाकी सुझुकी जिक्सर एम एच २७ बी एम ८३९३ कि २,५०००/- रुपये ची मोटरसायकल ठेवलेल्या ठिकाणी दिसली नाही वरुन शोध घेतला मिळुन आली नाही करीता कोणीतरी अज्ञात चोरटयाने त्यांची मोटरसाकल चोरुन नेली आहे असा फिर्यादीच्या जबानी रिपोर्टवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ईतर :-

| अ.क्र. | पो.ठाणे अप.क्र. व कलम | घटना स्थळ | गु.घटना ता व वेळ माहिती ता.वेळ गु.दाखल ता. वेळ | फिर्यादीचो नांव पत्ता | आरोपीचे नाव व पत्ता | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पो.स्टे.गाड गेनगर अप.क्र. ४०३/२४ कलम १२२ म.पो.का. | कॉटन मार्केट परिसर अमरावती | दि. २३.४.२४चे ००१५ वा<br><br>दाखल दि. २३.४.२४ चे ०२.१४ वा. | पो.हे.का. भरत वानखडे ब.न १०५ पो.स्टे.गाडगेनगर अमरावती | आकाश रामदास दिहाडे वय २६ वर्ष.रा. गांधी आश्रम झोपडपट्टी .अमरावती | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील फिर्यादी हे पो.स्टे. स्टाफसह सरकारी वाहनाने पेट्रो.करीतत असताना एक इसम अंधाराचा फायदा घेवुन तोंडाला दुपट्टा बांधुन अंधारात दळुन बसुन दिसला त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवुन त्यास कॉटन मार्केट परिसरात भटकण्याचे कारण विचारले असता त्याने पंचासमक्ष समाधानकारक उत्तर न दिल्याने तो चोरी करण्याच्या उद्देशाने फिरत असल्याचे संशय आला. अशा फि.च्या लेखी तक्रारीवरुन सदरचा गुन्हा दाखल |

## ➢ प्रोव्हीशन रेड :-

| अ. क्र. | पो.ठाणे | गु.र. नं. व कलम | गुन्हयाचा प्रकार | गुन्हा घडला ठिकाण | गुन्हा घडला ता.वेळ | गुन्हा दा. ता.वेळ | फिर्यादी नांव पत्ता व वय | अटक/पाहिजे आरोपीचे नांव | भेट देणारे अधि. व वेळ | हकीकत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २ | पोस्टे सिटी कोतवाली | अप क्र १५८/२० २४ कलम ६५(ई) मदा | प्रोव्हिशन | जयस्तंभ चौक गांधी पुतळ्या जवळ अमरावी | घ.ता.वेळ दिनांक  २३.०४. २०२४ चे १४.१५ वा | दाखल ता.वेळ दिनांक २३.० ४.२० २४ चे १६.५ ६ वा | सपोउपनि राजेश सपकाळ ब नं ६२४ पोस्टे सिटी कोतवाली अमरावी शहर | शेख रमजान शेख चांद वय ३० वर्ष रा. बिसमील्ला नगर अमरावती | पोउपनि शशिकांत चिपडे पोस्टे सिटी कोतवाल अमरावती शहर | हकीकत अशा प्रकारे आहे की, यातील यांची सकाली ०८.०० वा ते २१.०० वा ड्युटी असतांना मिळालेल्या खात्रीदायक बातमीवरुन एक ईसम ग्रे रंगाची टिर्श मध्ये सरोज चौका कडुन जयस्तंभा चौका कडे काळया रंगाच्या बॅग मध्ये औषधी रित्या देशी दारु विक्री साठी पायदळ जात आहे अशा मिळालेल्या बातमीवरुन पोस्टाप व पंचासमक्ष फिर्यादी हे नमुद घ.ता.वेळी व ठिकाणी गेले असता एक ईसम आपल्या हातात एक प्लस्टीकची पिशवी घेवुन मिळउन आला त्यास पंचास्मक्ष विचारपुस केली असता त्याने आपले नाव शेख रमजान शेख चांद वय ३० वर्ष रा. बिसमील्ला नगर अमरावती असे सांगितले त्याचे ताब्यातील प्लास्टीकच्या पिशवीची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यामधे १०० नग देशी टॅंगो पंच काचेच्या पावट्या ३० एम.एल किमंत ३५००/- रु चा प्रोव्हीजन चा माल रुपये प्रोव्ही माल |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | **मिळुन आला. त्यास मालमत्ता परवाना विचारले असता परवाना नसल्याचे सांगितले सदर आरोपीचे कृत्य हे कलम ६५(ई) मदाका दारुबंदी कायद्याप्रमाणे होत असल्याने त्याचे विरुध्द फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन व डि ओ सा यांचे आदेशावरुन सदरचा गुन्हा दाखल** |

## ➢ अकस्मात मृत्यु :-

| अ. क्र. | पो.ठाणे मर्ग.क्र. व कलम | घटना स्थळ | मृतकाचे नांव | फिर्यादी | मरणाचे कारण | अकस्मात मृत्यूचे विवरण | चौकशी अधिका-यांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नांदगाव पेठ अमरावती मर्ग क्र. १८/२४ कलम १७४ जाफौ | रहाते घरी रामगंगा नगर नांदगाव पेठ | एक महिला | पुरुषोत्तम वासुदेव जिचकार वय ४१ वर्षे रा. वृषभ कॉलणी मंगलधाम कॉलणी जवळ अमरावती | गळफास घेतल्याने | हकिकत अशा प्रकारे आहे की, आज ड्युटीवर गेले असता त्यांची पत्नि हिने १२.३० वा दरम्यान फोनव्दारे माहिती दिली की, **मृतक** हिने रहात्या घरी दुस-या मजल्यावर स्लँप ला असलेल्या लोखंडी कड्याला पाळण्यासाठी दोरी बांधलेली असता त्या दोरीने फिर्यादचे साळीला फास लावुन घेतला आहे. अशा माहितीवरुन फिर्यादि व त्याची पत्नि असे दोघेही घरी गेले असता फिर्यादिचे साळीला फास लावुन घेतलेल्या पाळण्याचा दोरीवरुन शेजा-यानी खाली उतरुन घेतलेले दिसले. फिर्यादि ची कोणा बद्दल काही तक्रार नाही वरुन सदरचा मर्ग दाखल | सपोनि रविंद्र सहारे नांदगाव पेठ अमरावती |